# "शुध्दीपत्रक"

**रा.प.महामंडळाच्या चालक तथा वाहक पदाच्या भरतीकरीता अर्ज करण्यासाठी मुदतवाढ, विहीत अनुभव कमी करणे व महिला उमेदवारांसाठी विहीत उंची व अवजड वाहन चालन परवाना नसल्यास हलके वाहन चालविण्याचा एक वर्षाचा परवाना असल्यास अर्ज करण्याची मुभा देण्याबाबत.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक तथा वाहक पदाच्या जागा भरण्याकरिता जाहिरात क्र.१ व २ नुसार अर्ज मागविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१] जाहिरात क्र.०१ नुसार अर्ज करण्याची मुदत आज दिनांक ०८.०२.२०१९ रोजी समाप्त होत असल्याने, उपरोक्त सुधारणांनुसार पात्र होणा-या उमेदवारांना अर्ज करण्याकरीता एक आठवडा मुदतवाढ [ दिनांक १५.०२.२०१९ पर्यत ] देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जाहिरात क्र.०१ व क्र.०२/२०१९ करीता ऑनलाईन भरती प्रक्रीया शुल्क स्विकारण्याची तारीख दि.१५.०२.२०१९ अशी राहील, तर चलनाद्वारे भरती प्रक्रीया शुल्क स्विकारण्याची तारीख दि.१८.०२.२०१९ अशी राहील. अर्जामध्ये दुरुस्तीचा कालावधी दिनांक १९.०२.२०१९ रात्री ११.५९ वाजेपर्यंत राहील.

२] पुरुष उमेदवारांकरीता जाहिरातीमध्ये अनुभवासाठी अवजड वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त झाल्यापासून तीन वर्षाचा विना अपघात अनुभव आवश्यक असल्याचे नमुद करण्यात आले आहे.
**त्याऐवजी,**
अवजड वाहन चालविण्यासाठी परवाना प्राप्त झाल्यापासून एक वर्षाचा विना अपघात अनुभव आवश्यक राहील अशी सुधारणा करण्यात येत आहे.

३] महिला उमेदवारांकरीता जाहिरातीमध्ये अवजड वाहन चालविण्यासाठी परवाना प्राप्त झाल्यापासून तीन वर्षाचा विना अपघात अनुभव असल्याचे नमुद करण्यात आले होते.
**त्याऐवजी,**
अवजड वाहन चालविण्याचा परवाना किंवा एक वर्ष कालावधी पुर्ण केलेला हलके मोटर वाहन [ एल.एम.व्ही ] चालविण्याचा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिलेला वैध परवाना आहे, अशा महिला उमेदवार अर्ज करु शकतील.

४] महिलांसाठी शारिरीक पात्रता किमान उंची १६० सेंमी इतकी नमूद करण्यात आलेली आहे, त्याऐवजी किमान उंची १५३ सें.मी.इतकी आवश्यक राहील. इतर अर्हता वरील मुददा क्र.०२ व ०३ नुसार वगळून जाहीरातीप्रमाणे पूर्ण करणे आवश्यक राहील.

५] वरील मुददा क्र.३ व ४ प्रमाणे अर्ज करणा-या महिला उमेदवारांना निवड झाल्यास अवजड वाहन चालविण्याचा शिकाऊ परवाना प्राप्त झाल्यानंतर रा.प.महामंडळातर्फे एक वर्ष अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना रा.प.महामंडळाच्या नियमानुसार विद्यावेतन देण्यात येईल. सर्व महिला उमेदवारांचे एक वर्षाचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर अवजड वाहन चालविण्याचा नियमीत परवाना संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर रा.प.च्या प्रचलित नियमानुसार त्यांची वाहन चालन चाचणी घेण्यात येऊन, सदर चाचणीत उत्तीर्ण होणा-या महिला उमेदवारांना जाहिरातीत नमुद केलेल्या वेतनश्रेणीमध्ये नेमणूक देण्यात येईल.

६] चालक तथा वाहक पदाची परिक्षा दिनांक २४.०२.२०१९ रोजी घेण्याचे निर्णय घेण्यात आला आहे. **परिक्षा केंद्राबाबतची माहिती उमेदवारांना दिनांक २०.०२.२०१९ पर्यत ई-मेल / लघुसंदेश (SMS) द्वारे कळविण्यात येईल.**

***

Scanned by CamScanner